# ऐषआराम व चैनीकरीता ऑनलाईन साईटवरून भाडयाने कार व डिजीटल कॅमेरे घेवून त्याची परस्पर विक्री करून करोडो रूपयांचा अपहार व फसवणुक करणा—या भामटयास अटक

विशाल वसंत सानप, रा. किसननगर, ठाणे यांनी महेश भोगले नावाचे इसमाने फेसबुकवरून ओळख करून गोड बोलुन ऑगष्ट २०१८ मध्ये त्यांचा डिएसएलआर कॅमेरा घेवून गेला असून त्याने तो परत केला नाही व मिळुन येत नाही अशी तक्रार ठाणेनगर पोलीस ठाण्यात दाखल केली होती. सदर तक्रारीचे अनुषंगाने तपास केला असता महेश भोगले याने अश्याच प्रकारे ब—याच जणांची फसवणुक केली असल्याचे व तो कोणासही मिळुन येत नसल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचे तपासाकरीता ठाणेनगर पोलीस ठाण्याचे पथक स्थापन करण्यात आले.

सदर पथकाने अथक परिश्रम करून तांत्रीक माहीतीचे विश्लेषण करून माहीती काढुन महेश साबाजी भोगले, वय ३६ वर्षे, रा. मु. भोगलेवाडी, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग यास महाबळेश्वर येथुन दिनांक २२/१२/२०१८ रोजी ठाणेनगर पोलीस ठाणे गुन्हा रजी नंबर I २२६/२०१८ भादंवि कलम ४०६ या गुन्हयात अटक केली आहे. गुन्हयाचे तपासात त्याने सदरचे गुन्हे त्याने ऐषआरामात जिवन जगण्याकरीता केल्याचे सांगत असून आरोपीत हा संगणक तंत्रज्ञ असून चांगले इंग्रजी बोलत असल्याने कोणाचाही त्यावर पटकन विश्वास बसत असे. वस्तु भाडयाने घेतल्यानंतर तो स्वत:चे मोबाईल नंबर तसेच वास्तव्याचे ठिकाण बदलत असे. त्याने अश्याच प्रकारे ब—याच जणांकडुन कार व डिजीटल कॅमेरे ओलएक्स साईटवर सर्च करून संपर्क साधुन नंतर ते भाडयाने घेवून ते परत न करता त्याची विक्री केल्याची कबुली दिल्याने त्याचे सांगण्याप्रमाणे सखोल तपास करून त्याने भाडयाने घेवून विक्री केलेल्या १) टाटा टिएगो कार क्रमांक एमएच १२ क्युएफ ६३२१, २) शेवरोलेट बिट कार क्रमांक एमएच १२ एमएल ५८६६, ३) टाटा टेम्पो क्रमांक एमएच १२ एलटी ५३०२ अशी एकुण ०३ चारचाकी वाहने व एकुण ११ डिजीटल कॅमेरे असा एकुण १२,६५,२९९/— रू किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

आरोपीताविरूद्ध यापुर्वी नागरीकांची २७,८७,०००/— रू ची फसवणुक केल्याबाबत वर्तकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजी नंबर I ४४८/२०१५ भादंवि कलम ४२०, ४०६, ३४ प्रमाणे फसवणुकीचा गुन्हा दाखल असून त्यात त्याला अटक झाली आहे. त्याचेविरूद्ध स्वारगेट पोलीस ठाणे, पुणे शहर येथे गुन्हा रजी नंबर I ३३२/२०१७ भादंवि कलम ४२०, ४०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्हयातील १० लॅपटॉप त्याने विक्री केले असून ०२,००,०००/— रू ची फसवणुक केली आहे. सदर गुन्हयात तो फरारी होता व पुणे शहर पोलीस देखील त्याचे मागावर होते. त्याचेविरूद्ध आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर येथे ०९ पीडीतांची एकुण ५१,००,०००/— रू ची फसवणुक केल्याबाबत तक्रारीची चौकशी चालु आहे. अशा प्रकारे आरोपीताने सामान्य नागरीकांशी ओळख वाढवुन त्यांचा विश्वास संपादन करून त्यांची सुमारे ९४ लाख रूपयांचा विश्वासघात करून फसवणुक केलेली आहे. त्याची दिनांक २८/१२/२०१८ पावेतो पोलीस कोठडी असून अधिक तपास चालु आहे.

सदरची कामगीरी ही मा. पोलीस आयुक्त श्री विवेक फणसळकर, मा. सह पोलीस आयुक्त श्री मधुकर पाण्डेय, मा. अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री सत्यनारायण, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ १, ठाणे डॉ. डी एस स्वामी, सपोआ नौपाडा विभाग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक आर डी मालेकर, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री संजय साबळे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि अजीत गोंधळी, पोना १८९७ धनंजय पाटील, पोशि ३२६३ विक्रम शिंदे ठाणेनगर पोलीस ठाणे या पथकाने परिमंडळ १ कार्यालयातील पोउपनि गणेश केकाण व पोशि ७२६१ समाधान माळी यांचे तांत्रीक मदतीने केली आहे. अश्या प्रकारे भाडयाने वस्तु देताना दक्षता घेण्याबाबत नागरीकांना सुचित केले असून आरोपीत महेश भोगले याचेविरूद्ध कोणाच्याही काही तक्रारी असल्यास ठाणेनगर पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.



